*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

NAVJYOT /Vol. IX / Issue – II ISSN 2277-8063

# "महाराष्ट्रातील आरक्षण वर्गीकरण चळवळ: एक आकलन"

डॉ. माणिक सोनावणे , राज्यशास्त्र विभाग ,टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे

---

प्रस्तावना:

भारतीय राज्यघटनेमध्ये आरक्षण व सकारात्मक उपाययोजनेच्या तरतुदी केल्या आहेत. समाजातील मागास जातींना प्रस्थापित वर्गाच्या बरोबर आणण्यासाठीच्या प्रयत्नाचा भाग म्हणून आरक्षणाची तरतूद केली असून आरक्षणामुळे समाजपरिवर्तन आणि विषमता निर्मुलणाची मुहूर्त मेड रोवली गेली आहे. अनेक लोकांनी आरक्षणाचा लाभ घेतला असून उच्चा-शईआणि वेगवेगळया क्षेत्रात नोकऱ्या मिळवलेल्या आहेत. असे असले तरी आरक्षण धोरण त्यांच्यामध्ये सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी पुरेसे ठरलेले नाही. आरक्षणामुळे दलितातील थोडाफार लोकांना मिळाले असून दलितांवर हाजारो वर्ष झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी आणि त्यांचे सर्वार्थाने पुनर्वसन करण्यास असमर्थ ठरले आहे. अर्थात स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर शहरी आणि उच्चशिक्षित दलितांचा अपवाद सोडला तर बहुसंख्य दलितांच्या जीवनात विशेष फरक पडलेला नाही. त्यातच आरक्षणाचे लाभ देण्यासाठी निर्माण केलेल्या जाती गटातील (संवर्गातील) प्रबळ जातींनाच आरक्षणाचे लाभ मिळाले आहेत. तथापि संवर्गातर्गत बहुसंख्य जातींना आरक्षणाचे लाभ मिळालेले नाहीत. संवर्गातील प्रबळ जातींनी आरक्षणाचे जास्तीत जास्त लाभ घेतल्यामुळे त्याच संवर्गातील इतर जाती मागे पडल्या असून विकासाबाबत त्यांच्यामध्ये असमतोल निर्माण झाला आहे. अशा असंतुष्ट जातींनी त्यांच्या विकासाचे मुद्दे मोर्चे - आंदोलने काढून चव्हाटयावर मांडायला सुरवात केली आहे. त्यांना आरक्षणाचे लाभ मिळालेले नाहीत हे शासनाच्या लक्षात आणून देत असून मोर्चे - आंदोलने काढून निषेध नोंदवत आहेत. शासनाकडून सकारात्मक त्याला प्रतिसाद दिला मिळत असून केंद्र सरकारही या असंतुष्ट जाती गटांच्या मागण्यांचा विचार करत आहे. आरक्षणाचे मूल्यमापन करण्यासाठी अभ्यास गटांची व अभ्यास आयोग नेमून आरक्षणाचे लाभ खालच्या स्तरापर्यंत पोहचतात का? याची शाहनिशा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत पेपरमध्ये आरक्षणाचे वर्गीकरण करण्यासाठी होत असलेल्या मागण्याचा, काढलेल्या मोर्चे - आंदोलनाचा आणि चालविल्या जात असलेल्या चळवळीचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याआनुशंगाने आरक्षण वर्गीकरण चळवळीची पार्श्वभूमी आणि कारणांचा शोध घेणे, आरक्षण वर्गीकरण चळवळीच्या वाढ आणि विकासाची कारणे तपासणे, आरक्षण वर्गीकरणासाठी महाराष्ट्र आणि देशभरात सुरू असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे आणि आरक्षण वर्गीकरणाच्या चळवळीबाबत शासनाच्या प्रतिसादाची चिकित्सा करणे या प्रमुख मुद्द्याच्या चौकटीत पेपरची मांडणी केली आहे.

भारतीय राज्यघटनेमध्ये मानवनिर्मित विषमता नष्ट करून सर्व समाजाला सारख्या पद्धतीचे जीवन उपलब्ध करून देण्यासाठीच्या उपयुक्त ठरतील अशा अनेक तरतुदी स्वीकारल्या आहेत. हजारो वर्षे शिक्षण आणि सामान्य जीवन नाकारलेल्या शोषित, वंचीत असलेल्या मागास जातींवरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी आणि त्यांना इतर समाजांच्या बरोबर आनण्यासाठी आरक्षणाची तरतुद केली आहे. काळाच्या ओघात अनुसूचीत जाती जमातीतील अनेक लोकांनी आरक्षणाचा लाभ घेऊन वेगवेगळया क्षेत्रात नोकऱ्या आणि मिळवल्या आहेत. राज्यघटनेत केलेली आरक्षणाची तरतूद मागास जातींच्या विकासामध्ये केंद्रबिंदू ठरली आहे. आरक्षण धोरणानुसार केंद्र व राज्य सरकारच्या सेवेत आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग व्यवसायात शासकीय-निमशासकीय व्यवस्थापनामध्ये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये अनुसुचित जाती जमातींच्या लोकांना संधी मिळत आहे. दलितांच्या विकासाची धोरणे आरक्षणाद्वारे प्रत्यक्षात आली आहेत. थोडक्यात आरक्षणाची तरतूद दलितांसाठी वरदान ठरले असून मागास जातींच्या सर्वांगीण परिवर्तनाचा पाया ठरले आहे. वास्तविक पाहता शतकानुशतके दलितांवर झालेल्या अन्यायाची भरपाई करून त्यांना सामाजिक आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होण्यास सक्षम बनवणे हा आरक्षणाचा प्रमुख उद्देश आहे. आरक्षण धोरणामुळे दलितातील थोडाफार लोकांना या धोरणाचा फायदा होत आहे. तथापि आरक्षणाचे धोरण त्यांच्यामध्ये खर्या अर्थाचा सामाजिक न्याय निर्माण करण्यासाठी पुरेसे ठरत नाही. कारण आरक्षणाच्या माध्यमातून केलेल्या तरतुदी अत्यंत त्रोटक आणि अपुर्या आहेत, दलितांवर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन आणि पुनर्वसन करण्यास असमर्थ आहे. ज्या जातीनां शिक्षण, व्यवसाय आणि सार्वजनिक जीवनापासून अलिप्त ठेवले होते, त्यांचे माणूसपण नाकारले होते ते केवळ त्याच्यासाठी काही जागा राखीव ठेवल्यामुळे भरून निघू शकत नाही ही बाब आज स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर

सिद्ध झाली आहे. ग्रामीण भारतातील व शहरी झोपडपट्टयातील दलितांचे आजचे जीवन बघितल्यावर असे लक्षात येते की, देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्षानंतरही त्यांचे जीवन तेवढेच कलीस्द गुंतागुंतीचे आणि सुख-सुविधांच्या अभावामुळे विस्कळीत आहे. आरक्षणामुळे त्यांच्या जीवनात कोणताही मूलगामी परिणाम झालेला नाही. त्यातच आरक्षणाचे लाभ देण्यासाठी निर्माण केलेल्या जाती संवर्गातील प्रबळ जातींना आरक्षणाचे काहीअंशी लाभ मिळाले असले तरी ते केवल प्रातिनिधिक आहेत. बहुसंख्य मागासजातींच्या जीवनात काहीएक बदल झालेला नाही. बहुसंख्य मागास जातींनी गावगाडा सोडला नाही, शिक्षणाची कास धरली नाही परिणामी त्यांना शिक्षण मिळाले नाही परिणामी त्यांना आरक्षणाच्या माध्यमातून मिळणाऱ्या संधीचा उपभोग घेता आला नाही. अशा दलितांतर्गत मागे राहिलेल्या काही जातींनी काळाची पावले ओळखून शिक्षण घ्यायला सुरवात केली असून आरक्षणाचे लाभ मिळवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. मुळातच आरक्षणाच्या आधारे नोकरी अथवा शिक्षणाची संधी मिळालेल्या एस.सी. संवर्गातील लोकांची संख्या अत्यल्प आहे. मोठा गाजावाजा करून मागासजातींना दिल्या जात असलेल्या सोयी सवलती अत्यंत त्रोटक आणि अपुऱ्या आहेत आणि लाभ मागणार्या लोकांची संख्या प्रचंड मोठी आहे. अशा परिस्थितीत लाभ न मिळालेल्या जातींना आरक्षणाचे लाभ मिळविण्यासाठी पराकोटीचा संघर्ष करावा लागत असून दलितांतर्गत स्पर्धेचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर आरक्षणाचे लाभ सर्व दलित आदिवासींपर्यत पोहचले का? सर्व दलित जातींचा सारख्या पद्धतीने विकास होता आहे का? दलितांमधील सर्वात शेवटच्या घटकापर्यंत आरक्षणाचे लाभ पोहचता आहेत? जे जात समूह पहिल्यापासूनच आरक्षणाचे लाभ घेत आहेत त्या समूहालाच आरक्षणाचे लाभ वारंवार मिळत आहेत का? हे तपासून पाहण्याची वेळ आली आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत पेपर लोखाणासाठी पुढील पुढील उदिष्टे निर्धारीत केली आहेत.

उद्दिष्टे:

१) आरक्षण वर्गीकरण चळवळीचा आढावा घेणे
२) आरक्षण वर्गीकरण चळवळीच्या वाढ आणि विकासाची कारणे तपासणे
३) आरक्षण वर्गीकरणाच्या चळवळीबाबत शासनाच्या प्रतिसादाची चिकित्सा करणे

स्वतंत्र भारतात ज्या जात समूहांना शिक्षणाची संधी सर्वात अगोदर मिळाली त्या जात समूहाला लोकशाही प्रक्रियेचा सहभागी होण्याची संधी सर्वप्रथम मिळाली. शिकले म्हणून त्यांना लोकशाही प्रक्रियेत देऊ केलेल्या आरक्षणाचे लाभ घेता आले. तथापि अनुसूचित जाती संवर्गामध्ये अनेक जाती अशा आहेत की, त्यांची आत्ताकुठे पहिली पिढी शिक्षण घेत आहे. त्यामुळे त्यांच्यामध्ये क्षमता विकासाच्या कौशल्य व समता विकासाच्या गोष्टी दिसत नाहीत. परिणामी ते अस्तित्वात असलेल्या आरक्षणाचे लाभ घेऊ शकलेले नाहीत. काळाच्या ओघात या दलित व अतिमागास जातींमध्ये सुद्धा शिक्षणाचा हळूहळू प्रसार होत असून ते आज नोकरीच्या शोधात आरक्षणातून आपल्याला काही मिळेल का? याची वाट पाहत आहेत. तथापि आरक्षणाचे लाभ मात्र त्यांना मिळेनासे झाले आहेत. अनुसूचित जाती गटांमध्ये असलेल्या प्रभूत्वाशाली जातीनांच आरक्षणाचे सर्व लाभ मिळत आहेत.

ओबीसी गटाचा विचार केला तर इतर मागास जातीतील काही ठरावीक जातीनांच आरक्षणाचे लाभ मिळाले आहेत. ओबीसी गटातील बहुसंख्य छोट्या व कमी लोकसंख्या असलेल्या जातींना आरक्षण संधीचा लाभ घेता आलेला नाही. मुळात ओबीसी हा सर्वात मोठा संवर्ग असून या संवर्गासाठी केवळ २७% जागा आरक्षित आहेत. या आरक्षित ओबीसी जातीसांठी असलेल्या आरक्षणाचे लाभ त्यांच्यातील प्रभूत्वशाली जातिनीच घ्येताल्याच आढळत आहे. उदा. महाराष्ट्रातील कुणबी, लेवा पाटील आणि माळी या प्रमुख जातींनीच ओबीसी साठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेतला आहे. तथापि ओबीसीमध्ये छोटे-छोटे जाती गट आहेत त्यांना मात्र आरक्षणाचे लाभ मिळालेले नाहीत. हीच बाब अनुसूचित जातींच्या बाबतीतही घडत आहे अनुसूचित जातीमध्ये बुद्ध आणि महार या एकाच जातीने आरक्षणाचे जास्तीत जास्त लाभ घेतलेले आहेत. दुसरीकडे अनुसूचित जमातीमध्ये सुद्धा काही पुढारलेल्या जातीच आरक्षणाचे लाभ घेत आहेत. त्यामध्ये गोंड, ठाकर, महादेव कोळी या जमाती आहेत. त्यांनी आदिवासी आरक्षणाचे लाभ सर्वाधिक घेतले आहेत. आदिवासीमंधील गरीब वाड्या-तांड्यावर दुर्गम भागात राहणार्या आदिवासींना मात्र आरक्षणाचे लाभ मिळालेले नाहीत.

वरील सर्व परिस्थितीवरून असे दिसून येते की, जाती समुहाचा ठराविक संवर्ग / प्रवर्ग तयार करून दिलेले आरक्षण त्या त्या जात सवर्गातील छोट्या छोट्या जातीच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या द्रष्टीने कुचकामी ठरले आहे. कारण त्यांना त्यांच्या प्रवर्गासाठी सद्या असलेले सामाईक आरक्षण सामाजिक समतेच्या

तत्वाला बाधा पोचावीत आहे. संवर्ग/प्रवर्गनिहाय आरक्षणाची तरतूद दबलेल्या व अतिमागास जातींच्या सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी उपयोगाची नसून त्यांच्या सामाजिक न्यायाचे प्रश्न सोडविण्यास कुचकामी ठरत आहे. वरील विविध सवंर्गातील अनेक जाती आजही गाव खेड्यात, वाड्या- वस्त्यांवर आणि शहरी झोपडपट्टयात राहतात. त्यांना मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा व त्यांच्या भोवती असलेले वातावरण, त्यांची आर्थिक स्थिती व सामाजिक वास्तव शिक्षणासाठी पोषक नसल्यामुळे त्यांना आरक्षणाच्या संधीचा लाभ उचलण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आलेली नाही. परिणामी नोकरी मिळविण्यासाठीच्या लागणाऱ्या स्पर्धात्मक जगात मागे पडत आहेत. दुसर्या बाजूला व्यावासाय करण्यासाठी लागणारे भांडवल व व्यवसायीक कौशल्य या जातीच्या युवकांमध्ये नाही. म्हणून हे युवक केवळ नोकरी मिळविणे या एकाच ध्येयाच्या मागे लागलेले असतात. असे असले तरी काळ बदलत आहे प्रवर्गातील अन्य लहान-सहान जातीतील अनेक युवक शिक्षण घेऊण तयार असून नोकरी आणि शिक्षणाची संधी मिळण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. तथापि आजच्या स्पर्धात्मक जगात त्यांना रोजगाराची संधी मिळणे अवघड झाले आहे. कारण त्यांची स्पर्धा आज शैक्षणिक दृष्टीने प्रगती झालेल्या अर्थात आरक्षणाचे लाभ मिळविलेल्या सक्षम व प्रबळ जात समुहातील युवकांशी करावा लागतो. तथापि गाव-गाड्यात अडकून पडलेल्या, वाड्या-वस्त्यांवर राहणार्या व जिल्हा परिषद आथवा कार्पोरेशाच्या शाळेत चिमणीच्या मिणमिणत्या प्रकाशात शिकून अभ्यास केलेल्या युवकांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या युवकांशी स्पर्धा करावी लागत आहे. त्यामुळे आधुनिक काळातील रोजगार संधीचा त्यांना लाभ घेता येत नाही, एव्हाना लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले दर्जेदार शिक्षण त्यांना मिळालेले नाही म्हणून आरक्षण संधीचा लाभ घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आलेली नाही.

वरील सर्व परिस्थिती त्या त्या प्रवर्गातील सर्व जातीच्या समान सामाजिक व आर्थिक विकासाच्या द्रष्टीने घातक आहे ही बाबा लक्षात आल्यामुळे त्या जात समूहाकडून निषेध नोंदवला जात आहे. मोर्चे काढले जात असून समाज माध्यमातून व रस्त्यावरची चळवळ चालवली जात आहे आणि आरक्षणाच्या वर्गीकरणाची जातनीहाय अ.ब.क.ड. वर्गीकरण करण्याची मागणी केली जात आहे. कारण त्यांना सद्यकालीन असलेले प्रवर्गनिहाय सामाईक आरक्षण सामाजिक समतेच्या तत्वाला बाधा पोचावीत आहे असे वाटते. म्हणून अस्तित्वात असलेली आरक्षणाची तरतूद दबलेल्या व अतिमागास जातींच्यासाठी कुचकामी ठरत असल्याची भावना वाढीस लागली आहे. याबाबत त्या जातीतील संघटना आवाज उठवित आहेत. एस.सी., एस.टी. आणि ओबीसीच्या आरक्षणाच्या नावाखाली त्या त्या जातासुहातील छोट्या व कमी लोकसंख्या सलेल्या जातींचा आवाज दबला जात आहे, त्या जाती अजूनही लाभाच्या प्रतीक्षेत आहेत एकत्रित असलेल्या आरक्षणाचे आपण बळी ठरत असल्याची भावना त्यांच्यामध्ये वाढीस लागली आहे.

निष्कर्ष:

१) आरक्षण असूनही आरक्षणाचे लाभ मिळत नाही म्हणून संवर्गनिहाय असंतुष्ट जाती एकवटत असून स्वतंत्र आरक्षणाची मागणी करीत आहेत.

२) आरक्षण संवर्गातील प्रबळ जातींनी आरक्षणाचे जास्तीत जास्त लाभ घेतल्यामुळे या संवर्गातील इतर जाती मागे पडल्या असून समाजाच्या मुख्य प्रवाहात आलेल्या नाही विकासाबाबत त्यांच्यामध्ये असतो असमतोल निर्माण झाला असून आरक्षित संवर्गात नवा मध्यमवर्ग निर्माण झाला आहे.

३) आरक्षित समूहातील प्रबळ जातींचा आरक्षणाच्या वर्गीकरणाला प्रचंड विरोध आहे.

सारांश:

आरक्षणाच्या माध्यमातून मागील ७० वर्षात दिलेल्या लाभाची समीक्षा होणे गरजेचे आहे. कारण आज शिकून शिक्षण घेऊन तयार असलेल्या पिढीला आरक्षणाचे लाभ मिळत नाहीत. हे पुन्हा एकदा तपासून पाहण्याची व त्याचे परीक्षणं करण्याची गरज आहे. जे समूहा घेण्यास सक्षम झालेले आहेत त्यांना पुन्हा पुन्हा आरक्षणाचे लाभ घेऊ द्यायचे की ज्या जाती पर्यंत आरक्षणाचे लाभ पोहचेले नाहीत त्यांना आरक्षणाचे लाभ देण्यासाठी आरक्षणाचे वर्गीकरण करायचे की आर्थिक आधारावर आरक्षण द्यायचे याचा नव्याने विचार करण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर आरक्षण व्यवस्थेची समीक्षा व्हावी आरक्षणाचे परत एकदा मूल्यमापन व्हावे अशी मागणी जोर धरत आहे दुसऱ्या बाजूला आर्थिक आधारावर आरक्षण दिले जावे अशी मागणी पुढे येत आहे. आरक्षणामुळे भ्रमनिरास झालेल्या असंतुष्ट गटाकडून त्यांच्या त्यांच्या विकासाचे मुद्दे चर्चिले जात असून त्यांच्या विकासाचा प्रश्न समजून घेऊन भारतातील काही राज्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे केंद्र

सरकारही या असंतुष्ट जाती गटांच्या मागण्यांचा विचार करत असून आरक्षणाचे वर्गीकरण करण्यासाठी आरक्षणाचे मूल्यमापन करण्यासाठी अभ्यास गटाची व आयोग यांची नेमणूक करत केली आहे.

आरक्षण चळवळीला येत असून महाराष्ट्रात मराठा हरियाणा राजस्थानमध्ये गुजर व देशातील गरीब सवर्णांना १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. डॉ. उषा मेहता आरक्षणा वर्गीकरण अहवालाच्या आधारे केलेले आंध्रप्रदेश मधील अनुसूचित जाती आरक्षणाच्या वर्गीकरणामुळे मादिका या दुर्बल जातसमुहाला चांगला लाभ मिळाला आहे. डॉ.उषा मेहता यांच्या आयोगाच्या शिफारशी स्वीकारून आंध्रप्रदेशमध्ये आरक्षणाचे अ ब क ड वर्गीकरण केलेले होते. आरक्षणाच्या वर्गीकरणाच्या विरोधात जाती न्यायालयीन दाद मागत असून त्यांच्या न्यायालयात जाण्यामुळे आरक्षणचे वर्गीकरणाची प्रक्रिया ठप्प झाली आहे. राजकीय पक्षाकडून आरक्षणाच्या वर्गीकरण प्रक्रियेत कोणत्याही प्रतिसाद दिला जात नाही. केवळ सर्व जातींना व्होट बँकेच्या नजरेतून बघून कोणत्याही दुसऱ्या गटाला प्रभावित करण्याची किंवा नाराज करण्याची इच्छा कोणताही राजकीय पक्ष बाळगून आहे उलट परिस्थिती केवळ बघ्याची भूमिका राजकीय पक्षाकडून घेतली जात आहे. केंद्र सरकार करून आरक्षणाच्या धोरणाचा आढावा घेतला जात असून आरक्षणाच्या धोरणांची चिकित्सा केली जात असून आर्थिक आधारावर देण्यासाठी छुपा अजेंडा राबविला जात आहे.

सुरुवातीच्या काळात जे समूह आरक्षणाच्या विरोधात होते ते समूह आज आरक्षण मिळावे यासाठी प्रयत्न करत आहेत. उदाहरणार्थ पटेल हार्दिक पटेल हे सुरुवातीला किंवा गुजरात मधील पटेल समुदाय हा सुरुवातीला आरक्षणाच्या विरोधात होता तथापि काळाच्या ओघात त्यांनी स्वतःसाठी वेगळया आरक्षणाची मागणी करायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्रात मराठा जात समूह सुरुवातीच्या काळात आरक्षणाच्या विरोधात होता तथापि मागच्या काही दिवसांमध्येच मराठा आंदोलनांनी मराठा आरक्षणाची मागणी जोर धरलेला आहे आणि मराठा समाजाला आरक्षण मिळवले सुद्धा आहे. थोडक्यात काय तर आरक्षण व्यवस्था ही सर्वांना हवी आहे या आरक्षणाचे लाभ आज भारतातील जवळपास ७२ टक्के जनता घेत आहे. या आरक्षणामुळे आपल्या जातीचाही विकास होऊ शकतो अशी सामान्य भावना बहुसंख्य जातसमुहांच्या मध्ये निर्माण झालेली आहे. असे असले तरी 'आरक्षणाची व्यवस्था हा गरिबी निर्मूलनाचा कार्यक्रम नाही' ही बाब लक्षात घेणे गरजेचे आहे. आर्थिक आधारावर आरक्षण देणे उपयोगाचे नाही, आरक्षण देण्याला एक विशिष्ट पार्श्वभूमी अर्थात सामाजिक स्तर आणि सामाजिक अन्याय अत्याचाराची पार्श्वभूमी असणे आवश्यक असताना बहुसंख्यांकांचे राजकारण करणाऱ्या राजकीय पक्षांनी मात्र आरक्षण देताना ज्या सामाजिक तत्त्वांचा आधार घ्यायचा असतो त्याकडे दुर्लक्ष करून आर्थिक आधारावर आरक्षण द्यायला सुरुवात केली आहे. २०१९ मध्ये सवर्ण जातीतील आर्थिकदृष्ट्या गरीब लोकांना १० टक्के आरक्षण देण्याचा कायदा मोदी सरकारने घेतला हे त्याचेच उदाहरण आहे. शासनाकडून विविध जात समूहाला आरक्षण देऊन त्यांचे व्होट बँकेत रुपांतर कारीत आहेत. म्हणून आरक्षणाचे राजकारण करण्याकडे राजकीय पक्षांचा कल वाढत आहे.

संदर्भ:

१) भावे चिन्मय **जात आणि आरक्षण,**
www.google.co.in/amp/s/chinmaye.com/2015/09/23/जात-आणि-आरक्षण.

२) दै. लोकमत, नागपूर, दि. ८ अगस्ट २०१९, पान नंबर ७.

३) जाधव विशाल, आरक्षण: एक विश्लेषण, दै जनतेचा महानायक, दि.२ सप्टेंबर २०१६

४) डॉ. अभिराम दीक्षित, ब्लऑग मुंबई.

५) प्रा. चौथाईवाले सुरेश, महाराष्ट्रातील मातंग जातीच्या वास्तव समस्या, लहूजी प्रकाशन औरंगाबाद २०१०.

६) प्रा. डोंगरे अरविंद, आर्थिक विषमतेविरुद्धचा झंजावात, साद प्रकाशन, औरंगाबाद २०१३.